श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी, संचालित


# संगमेश्वर कॉलेज
# सोलापूर



# प्रतिभासंगम

**वर्ष पाचवे** । अंक ११ वा । **एप्रिल ते जून २०२३**

**श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी संचलित...**
**संगमेश्वर कॉलेज,सोलापूर**



प्रेरणास्थान

# प्रतिभासंगम

**संपादक** – धर्मराज काडादी

**सहसंपादक** - प्रा. संतोष पवार
प्रा. शिवराज पाटील

**समन्वय समिती –**
प्राचार्य डॉ.राजेंद्र देसाई
उपप्राचार्य प्रसाद कुंटे
प्रा. एस. डी. गोठे

**मुखपृष्ठ** – सचिन क्षीरसागर (विराक्षी)

**सजावट व मांडणी** – प्रदीप कोडगीमठ
रामचंद्र कुलकर्णी

**मुद्रक प्रकाशक** -
कल्पकला प्रिंटिंग प्रेस,
होटगी रोड, सोलापूर.

**संपर्क** – 0217/2600481 /82
**ई-मेल** –
pratibhasangam@sangameshwarcollege.in
**वेबसाईट** -www.sangameshwarcollege.in

## अंतरंग...

विद्यार्थ्यांनी आपल्या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. आपल्या मोकळ्या वेळेत शिक्षकांकडून मार्गदर्शन घ्यावे. आपल्या दैनंदिनीचे टाईमटेबल बनवून वेळेचा सदुपयोग केल्याने यश नक्कीच मिळतो. विद्यार्थ्यांनी वेळेचे भान राखून आपल्या लक्षाचे निर्धारण करावे.काही लोक त्यांच्या पैशाला वेळेपेक्षा जास्त महत्त्व देतात, तथापि, सत्य हे आहे की वेळेपेक्षा अधिक मौल्यवान काहीही नाही. 3

देशभरात एनसीसीचा अमृत महोत्सव अर्थात 75 वा वर्धापन दिन साजरा होत आहे. प्रतिवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या रविवारी एनसीसी दिवस साजरा असतो. संपूर्ण देशात महारक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त ) ९ महाराष्ट्र बटालियन एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यामध्ये ८२ विद्यार्थी आणि २६ विद्यार्थिनींचा समावेश होता.एकूण १०८ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. 13

"महाविद्यालयीन जीवनात विज्ञान विश्वातील अगाध ज्ञानाचा अभ्यास करत समाजहिताचे संशोधक व्हा. त्यासाठी विज्ञान विषयांची पुस्तके वाचा. संशोधकांच्या कार्याची माहिती जाणून घ्या. त्यांचे संशोधन कार्यातील कष्ट आणि एकाग्रता यांचा अभ्यास करा. त्याचा आपल्याला भावी आयुष्यात उपयोग होतो." असे प्रतिपादन सुलभा वठारे यांनी केले. 16

विज्ञान विश्वकल्याणासाठी हे ब्रीद घेऊन विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन प्रतिवर्षी केले जाते. यामध्ये १०० प्रयोगांचे संच यामध्ये सहभागी झाले होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य यांनी केले. नागेश कोल्हे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांनी जगभरातील वैज्ञानिक शोध आणि शास्त्रज्ञांचे किस्से सांगत विद्यार्थ्यांचे मनोरंजन करत उद्बोधन केले. 21

संगमेश्वर कॉलेज स्वायत्त कनिष्ठ विभागाच्या भाषा संकुलाच्या वतीने आयोजित मराठी, हिंदी, इंग्रजी, कन्नड, संस्कृत या पाच भाषांमधील अभिवाचन सुलेखन स्पर्धेस उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात शहरातील विविध महाविद्यालयातील ५१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. अभिवाचनासाठी पाठ्यपुस्तकातील आपल्या आवडीची कथा-कविता, गद्य उतारा निवडण्यास विद्यार्थ्यांना संधी दिली होती . 23

# दैनंदिन आहारातील भरडधान्याचे महत्त्व ओळखा -- दिनेश क्षीरसागर (अन्नशास्त्रज्ञ)

# संगमेश्वर कॉलेज व कृषी विभाग यांचा संयुक्त उपक्रम



**सोलापूर (दिनांक 11 एप्रिल )** '' दैनंदिन आहारातील भरडधान्याचे महत्त्व ओळखा आणि विषमुक्त शेतीसाठी आपल्या घरापासून सुरुवात करा. उत्तम आहार तेही नैसर्गिक आहार असेल तरच आपले यापुढील जीवन सुखकारक होईल.अन्यथा भविष्यातील मोठ्या संकटांना आपल्याला सामोरे जावे लागणार आहे.'' असे प्रतिपादन अन्नशास्त्रज्ञ दिनेश क्षीरसागर यांनी केलं. ते संगमेश्वर कॉलेज आणि कृषी विभाग पाककला स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात आयोजित केलेल्या मुख्य व्याख्यानाच्या कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी मंचावर मंडल कृषी अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई, मंडल कृषी अधिकारी कृष्णा थिटे आदी मान्यवर उपस्थित होते. आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्षानिमित्त भरडधान्य पाककला महोत्सव आणि व्याख्यानाचे आयोजन केले होते .



# संगमेश्वर कॉलेज व  कृषी विभाग यांचा संयुक्त उपक्रम ...








प्रारंभी कृषी विभागाच्या वतीने प्रास्ताविक झाले आणि संगमेश्वर कॉलेज ,कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमान आयोजित केलेल्या या स्पर्धेचा आणि व्याख्यानाचा हेतू प्रा. शुभांगी गावंडे यांनी स्पष्ट केला . त्यानंतर अन्नशास्त्रज्ञांचे व्याख्यान झाले .  कृषी विभागाच्या वतीने बचत गटांचा देखील या कार्यक्रमात सहभाग होता यानंतर घेण्यात आलेल्या पाककला स्पर्धेचा निकाल महिला विभागातून प्रथम -  रेखा हनुमंत हजारे ( महिला बचत गट) द्वितीय - डॉ.आरती दिवटे (संगमेश्वर कॉलेज), तृतीय  - वैभवी मायनाळे ( संगमेश्वर कॉलेज ) ,उत्तेजनार्थ -  सौ वर्षा कांबळे ( महिला बचत गट) अनुक्रमे अनुक्रमे एक हजार, सातशे, पाचशे आणि तीनशे रुपये प्रमाणपत्र देऊन यांचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे या स्पर्धेमध्ये महिला आणि मुलींसोबत संगमेश्वर कॉलेजच्या शेतकरी मुलांनी देखील सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन प्रा. आरती दिवटे यांनी केले तर  प्रा. एस एस कारंडे यांनी सर्वांचे आभार मानले. याप्रसंगी  विज्ञान विभागातील प्रा.महानंदा बगले,प्रा.संगिता  जोगदे, प्रा. महेंद्र कावळे,प्रा.केशा गायकवाड,परीक्षक निवृत्त प्रा. डॉ.नेहा चक्रदेव, प्रा.ज्योती दुधनी,प्रा.संतोष पवार विद्यार्थी,महिला बचत गटाच्या महिला  मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सजग समाजभानातूनच आपले व्यक्तिमत्व घडते --- प्रा. शिवराज पाटील

# संगमेश्वरमध्ये व्यक्तिमत्व विकासावर व्याख्यान



सोलापूर (दिनांक ६ एप्रिल ) '' महाविद्यालयीन जीवनात पारंपरिक शिक्षणाबरोबरच वाचन,चिंतन करताना समाजातील आजूबाजूला घडणाऱ्या घडामोडींकडे उघड्या डोळ्यांनी पाहिले की समाजभान येतं आणि समाजभानातूनच आपले व्यक्तिमत्व घडत जातं'' असं प्रतिपादन प्रा. शिवराज पाटील यांनी केले. ते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) आयोजित ' व्यक्तिमत्व विकास ' या विषयावर आयोजित केलेल्या विशेष निमंत्रित व्याख्यानात बोलत होते.

याप्रसंगी अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डी. एम. मेत्री, व्यक्तिमत्व विकास विभागाचे समन्वयक रामचंद्र संगशेट्टी, मराठी विभागप्रमुख डॉ. सुहास पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी नागरी सेवापदवी अभ्यासक्रमाच्या समन्विका डॉ. वंदना भानप प्रास्ताविक केलं या प्रास्ताविकात व्यक्तिमत्व विकासाचे महत्त्व त्यांनी आधारित केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. सत्कारानंतर प्रमुख वक्त्यांनी विद्यार्थ्यांशी दिलखुलास संवाद साधला.

यावेळी प्रा.डॉ.रेश्मा शेख,प्रा.डॉ.श्रीनिवास भंडारी, प्रा.रेवणसिद्ध हालोळी, प्रा.संतोष पवार,प्रा.प्रवीण राजगुरू, प्रा.युवराज सोलापूरे यांच्यासह नागरी सेवापदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**या संवादाचा व्हिडिओ पाहण्यासाठी या लिंक वर क्लिक करा आणि संगमेश्वर कॉलेजच्या युट्युब चॅनेलला अवश्य सबस्क्राईब करा.** https://youtu.be/06vAkUdw2Wk

# अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थीदशेत निवेदन कलेतून भाषिक जाणीव निर्माण होते --- प्रा.डॉ. सुहास पुजारी





सोलापूर ( दिनांक १३ ) '' विद्यार्थ्यांनो कोणत्याही शाखेत करिअर करा मात्र उत्तम बोलता आले तरच तुमचे परिपूर्ण व्यक्तिमत्व घडते. निवेदन व सादरीकरण ही कला अवगत होण्यासाठी पाठांतराचे मूल्य नाकारता येत नाही. उत्तम सकस वाचनही महत्वाचे आहे. थोरा मोठ्यांचे विचार, सुभाषिते, सुविचार, सुवचने यातून तसेच संत वचनातूनही उत्तम विचारांचे सादरीकरण आपण करू शकतो. आवाजाच्या दुनियेतील उत्तम कलाकारांचे निरीक्षण करा.'' असा सल्ला मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुहास पुजारी यांनी दिला. ते संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) विभाग कनिष्ठ विभागाच्या निवेदनकला तंत्र आणि सादरीकरण या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी मंचावर पर्यवेक्षक मल्लीनाथ साखरे, अभ्यासक्रम समन्वयक प्रा.अशोक निम्बर्गी उपस्थित होते.

संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त) विभाग कनिष्ठ विभागाच्या निवेदनकला तंत्र आणि सादरीकरण या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.सुहास पुजारी

प्रारंभी प्रा. अशोक निंबर्गी यांनी प्रास्ताविक केले. त्यात भाषिक कौशल्याचे महत्त्व सांगून सर्वांगिण व्यक्तिमत्त्वासाठी बोलणे ही कला कशी महत्त्वाची आहे, याचे महत्त्व सांगितले.त्यानंतर डॉ.सुहास पुजारी यांचा सत्कार झाला.

सत्कारानंतर प्रा. संतोष पवार यांनी अभ्यासक्रमाचा आराखडा स्पष्ट केला.त्यानंतर डॉ. पुजारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.आपल्या अध्यक्षीय मनोगतात पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.सूत्रसंचालन दत्तात्रय गुड्डेवाडी यांनी केले तर आभार साहेबण्णा निम्बर्गी यांनी मानले. कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## समृद्ध जीवनशैलीसाठी परोपकारी निसर्गाचे महत्व ओळखा' -- डॉ.व्यंकटेश मेतन

# नेचर वॉकच्या निमित्ताने संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांशी संवाद




सोलापूर ( दिनांक १७ ) '' देतो तो निसर्ग राखतो तो माणूस या उक्तीप्रमाणे देणाऱ्या निसर्गाचे अस्तित्व अबाधित राखण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. भविष्यातील समृद्ध जीवनशैलीसाठी परोपकारी निसर्गाचे महत्त्व ओळखा.'' असे सांगत सोमवारच्या प्रसन्न सकाळी निसर्गप्रेमी, प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ , ( वाईल्ड लाईफ फोटोग्राफर ) वन्यजीव छायाचित्रकार,पक्षी जगताचे अभ्यासक डॉ.व्यंकटेश मेतन यांनी संवाद साधला. ते संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग भूगोल विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या ' नेचर वॉक ' उपक्रमात बोलत होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रसाद कुंटे,पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे आदी उपस्थित होते.



# नेचर वॉकच्या निमित्ताने संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांशी संवाद...



प्रारंभी सर्व विद्यार्थी संमती कट्ट्याजवळ एकत्र जमले. त्यानंतर प्रा. डॉ.विठ्ठल अरबाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर डॉ. मेहता यांनी विद्यार्थ्यांशी नेचर वॉक, हेरिटेज वॉक , मानवी जीवनशैली  या विषयावर संवाद साधला. विद्यार्थ्यांना परोपकारी समृद्ध निसर्गाचे महत्त्व सांगितले. आपल्या अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य प्रसाद कुंटे यांनी कॉलेजच्या वतीने सुरू केलेल्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या भविष्यात असेच विद्यार्थी केंद्री उपक्रम राबवण्यात येतील असे सांगितले. त्यानंतर रात्र महाविद्यालयाच्या प्रा. सोनाली गिरी यांनी शिवयोगी सिद्धरामेश्वर परिसरातील मंदिरे , वास्तू याविषयी तसेच भुईकोट किल्ल्यातील महत्त्वाच्या संदर्भांचा आढावा घेत विद्यार्थ्यांसोबत वास्तू  निरीक्षण केले. शिवयोगी सिद्धरामेश्वरांच्या ऐतिहासिक कार्याची ही माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी कला शाखेतील प्रा.शंकर कोमुलवार ,प्रा.दत्तात्रय गुड्डेवाडी ,प्रा. शिवराज देसाई, प्रा.प्रकाश कतनळी, प्रा.हर्षवर्धन पाटील ,प्रा.संतोष पवार, प्रा. विक्रांत विभुते  यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. उद्घाटन सत्राच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रश्मी कन्नूरकर यांनी केले तर आभार प्रा. शिवशरण दुलंगे यांनी मानले.





# संगमेश्वरच्या भूगोल विभाग माजी विद्यार्थ्यांचा मेळा उत्साहात






सोलापूर (रविवार दिनांक १६ एप्रिल) भूगोल विभागातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा उत्साहात संपन्न झाला. संगमेश्वर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी रविवारी १६ एप्रिलला कॉलेजच्या प्रांगणात जमले होते.१९९५ पासून विविध क्षेत्रात कार्यरत असलेले शेतकरी, प्राध्यापक, शिक्षक, उद्योजक, अभ्यासक, गृहिणी, प्रशासक, पोलीस प्रशासन, वित्त व वितरण विभाग या बहुविध क्षेत्रात कार्यरत विद्यार्थी एकत्र आले होते. प्रत्येकाने आपल्या आठवणीने उजाळा देत संगमेश्वर कॉलेजच्या संस्कारात मोठे झालो असल्याची कृतज्ञ भावना व्यक्त केली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा भूगोल असोसिएशन तर्फे जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित निवृत्त प्राचार्य के. एम. जमादार प्रा.डॉ. नेहा चक्रदेव, प्रा. मधुरा वडापूरकर, माऊली महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य दत्तात्रय हरवाळकर यांना निमंत्रित करण्यात आलं होतं.

मेळाव्यास संगमेश्वर गीताने प्रारंभ झाला. प्रारंभी विद्यमान भूगोल विभाग प्रमुख राजकुमार मोहोरकर यांनी जुन्या आठवणींना उजाळा देत प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रा.डॉ.दीपक देडे, प्रा.डॉ.दीपक नारायणकर, सौ. दीप्ती इंगळे,प्रा.सौ.बिराजदार,किरण पुजारी, पोलीस हेड कॉन्स्टेबल शहाजी धायगोडे, प्रगतशील शेतकरी अक्षय क्षीरसागर,प्रा संतोष पवार या मान्यवरांनी आपल्या आठवणी सांगत आम्ही कसे घडलो ? आमच्या जडणघडणीत संस्था आणि शिक्षकांचे कसे योगदान आहे हे अधोरेखित केले. भविष्यातील माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याचा आराखडा मांडला गेला.

# ' आला उन्हाळा, तब्येत सांभाळा ' - संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांचे प्रबोधन

## संगमेश्वर कॉलेज कनिष्ठ विभाग कला शाखेचा उपक्रम




सोलापूर ( दिनांक १९ एप्रिल ) '' वाढत्या उन्हाच्या तीव्रतेचा धोका ओळखून तापमानाचा पारा सध्या राज्यभर ४० च्या वरती जात असल्याने संगमेश्वर कॉलेज स्वायत्त कनिष्ठ विभाग कला शाखेच्या वतीने प्रबोधन करत उन्हाळ्यात काळजी घेण्यासाठी टोपी वापरा, पुरेसे पाणी प्या, पाण्याची बाटली जवळ ठेवा अश्या आशयाचे फलक दर्शवून प्रबोधन केले. 'आला उन्हाळा, तब्येत सांभाळा ' अशा घोषणा दिल्या. यामध्ये समृद्धी सावंत , नेहा अय्यर, हेमंत नक्का, आकांक्षा पाठक, श्रेयसी कुंटे,राजश्री बन्ने यांच्यासह कला शाखेतील विद्यार्थ्यांनी जनतेशी संवाद साधला.

याप्रसंगी प्राचार्य राजेंद्र देसाई, उपप्राचार्य प्रसाद कुंटे, समन्वयक शिवशरण दुलंगे, प्रा.अशोक निम्बर्गी प्रा.शहाजी माने, प्रा.शिवराज पाटील, प्रा. एस. बी. निम्बर्गी, प्रा. डॉ.विठ्ठल अरबाळे, प्रा. शंकर कोमुलवार ,प्रा. दत्तात्रय गुड्डेवाडी, प्रा. विश्वनाथ कक्कळमेली, प्रा.कोमल कोंडा, प्रा.रश्मी कन्नूरकर,प्रा. प्रकाश कतनळी, प्रा. हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.

# उद्योग, व्यवसायात वस्तू व सेवा कर ही बाब महत्त्वाची आहे

-डॉ.बाळासाहेब मालेगावकर

## संगमेश्वर नाईट कॉलेजमध्ये जीएसटी प्रणालीवर यावर व्याख्यान






**सोलापूर दिनांक 25** " कोणत्याही उद्योगात व्यवसायात आर्थिक नियोजन करतो त्यासोबत असलेल्या वस्तू व सेवा कराची प्रक्रिया ही महत्त्वाची बाब आहे. उत्पादित वस्तू ग्राहक केंद्र बनवताना जीएसटी सोबत मूल्यांकन करावे लागते. असे प्रतिपादन डॉ.बाळासाहेब मालेगावकर ( राज्यकर उपायुक्त, वस्तू व सेवा कर, सोलापूर) यांनी केले ते संगमेश्वर रात्र महाविद्यालय वाणिज्य विभाग आयोजित व्याख्यानात जीएसटी प्रणालीवर बोलत होते. याप्रसंगी प्राचार्य एस.डी.गोठे ,डॉ.व्ही. सी.अचकनळी आदी उपस्थित होते.

प्रा.घनाते यांनी प्रास्ताविक केलं. परिचय प्रा.आर.एस. कोळी करून दिला. जीएसटीचे फायदे, त्याची वैशिष्ट्ये, याद्वारे मिळवले जाणारे करसंकलन, नोंदणी प्रक्रिया या संबंधित विस्तृत माहिती त्यांनी दिली. याच कार्यक्रमात अर्थशास्त्र असोसिएशनचे उद्घाटन करण्यात आले.पदवी पूर्ण झाल्यानंतर या क्षेत्रातील करियर संबंधी उपल असलेल्या संधीची देखील त्यांनी माहिती दिली.प्रतीक्षा बसाटे हिने सूत्रसंचालन केले. आभार शारीरिक शिक्षण विभागप्रमुख शरण वांगी यांनी मानले. याप्रसंगी विद्यार्थी प्राध्यापक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन संगमेश्वर कॉलेजमध्ये मोठ्या उत्साहात.





**सोलापूर प्रतिनिधी ( दिनांक १ मे २०२३ )** महाराष्ट्र दिन हा महाराष्ट्र राज्याचा निर्मिती दिवस, संगमेश्वर कॉलेज (स्वायत्त ) मध्ये मोठ्या उत्साहात साजरा साजरा झाला. प्रारंभी मान्यवरांचे मैदानावर आगमन झाले.त्यानंतर तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. प्राचार्य राजेंद्र देसाई यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. उपस्थितांना प्राचार्यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

१ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची राज्याची निर्मिती झालेली आहे. या दिवशी राज्यात सार्वजनिक सुट्टी असते. हा दिवस मराठी माणसाचा आहे आणि ते मोठ्या उत्साहाने साजरा करतात, विविध कार्यक्रमांचे आयोजनही या दिवशी केले जाते. महाराष्ट्र राज्य निर्मितीसाठी बलिदान दिलेल्या १०६ हुतात्म्यांचे स्मरण या दिवशी केले जाते.

# बारावीत संगमेश्वर कॉलेजचा निकाल ९१.९७ टक्के




**सोलापूर दिनांक ( २५ मे २०२३ )** येथील संगमेश्वर ज्युनिअर कॉलेज ,सोलापूरचा बारावीचा निकाल ९१ .९७ टक्के इतका लागला. शाखा निहाय निकालाची टक्केवारी पुढीप्रमाणे - विज्ञान शाखा - ९८.४२ , वाणिज्य शाखा - ९४.२० , कला शाखा - ७७.९७ टक्के इतका लागला . विज्ञान व कला शाखेत मुलींनी बाजी मारली.तर वाणिज्य शाखेचा राघव विशाल बन्सल (प्रथम ९३.३३) हा विद्यार्थी कॉलेजमधून तिन्ही शाखांमधून प्रथम आला.

यशस्वी विद्यार्थी- विज्ञान शाखेतून - नंदिनी नागेश सुत्रावे ( प्रथम ८९.००) सलोनी पुषपराजसिंह बायस ( द्वितीय ८७.००) सुहानी ऋषिकेश शाह (तृतीय ८६.५०) तर वाणिज्य शाखेतून - राघव विशाल बन्सल (प्रथम ९३.३३) वरद विजय जोशी (द्वितीय ९३.००)समर्थ प्रसन्न स्वामी ( तृतीय ९२.१७) कला शाखेतून - प्रीती महादेव कोरी ( प्रथम ८९.६७ ) रोहित नारायणारं सुतार ( द्वितीय ८९.५० ) साक्षी चंद्रकांत करपे ( तृतीय ८८.१७)

याविद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. धर्मराज काडादी,संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी , प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई ,उपप्राचार्य प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक मल्लिनाथ साखरे, भाषा समन्वय प्रा. शिवराज पाटील , विज्ञान शाखा समन्वक प्रा. रामराव राठोड , वाणिज्य समन्वयक प्रा. बसय्या हणमगाव यांच्यासह सर्व विभागातील प्राध्यापकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.


संगमेश्वर कॉलेज बारावी वाणिज्य शाखा निकाल ९४.२० टक्के
राघव विशाल बन्सल ९३.३३
प्रथम


संगमेश्वर कॉलेज, बारावी विज्ञान शाखा निकाल ९८.४२ टक्के
हार्दिक अभिनंदन
नंदिनी नागेश सुत्रावे
(प्रथम 89 %)
संगमेश्वर कॉलेज, सोलापूर


संगमेश्वर कॉलेज, बारावी कला शाखा
निकाल ७७.९७ टक्के
हार्दिक अभिनंदन
प्रीती महादेव कोरी (८९.६७ )
प्रथम

# एमएचटी-सीईटी परीक्षेत संगमेश्वर कॉलेजमधून संचिता वठारे, नंदिनी सुत्रावे अव्वल स्थानावर



**एमएचटी- सीईटी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सोबत संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समिती सदस्य पुष्पराज काडादी,प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई,उपप्राचार्य प्रसाद कुंटे आणि शिक्षक वृंद.**

सोलापूर ( प्रतिनिधी ) महाराष्ट्र स्टेट कॉमन एंट्रन्स टेस्ट सेलकडून एमएचटी-सीईटी परीक्षेचा निकाल काल १२ जूनला जाहीर करण्यात आला. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित (PCM) आणि भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र (PCB) ग्रुप्ससाठी महाराष्ट्र कॉमन एंट्रेन्स टेस्ट २०२३ चा निकाल घोषीत करण्यात आला. यामध्ये संगमेश्वर कॉलेजमधून संचिता चंद्रशेखर वठारे ( ९८.०० पर्सेन्टाइल ),नंदिनी नागेश सुत्रावे ( ९९.६० पर्सेन्टाइल ) अव्वल स्थानावर राहिले.



पर्सेन्टाइलनुसार निकाल - ( PCB ) शकुंतला संतोष कलशेट्टी ९५.६, ओमकार महादेव शिवशेट्टी ९५,मोहम्मद कैफ इब्राहिम बिराजदार ९०.८७,ऐश्वर्या सिद्धाराम बिराजदार ८९ .८१,गणेश शशिकांत सकट ८८.६,शगुन संजय राठोड ८८.१७,निकिता गुरुशांत हावशट्टी ८७.४५,वैष्णवी अजित जाधव ८६.११,प्रिया विनायक परदेशी ८५.५३, विश्वजीत अतुल कोथिंबीर ८५.३८.पर्सेन्टाइलनुसार (PCM) - देवांग नितीन देशपांडे ९८.६९, विद्याराणी पृथ्वीराज देशमुख ९८.५,सलोनी पुष्पराज सिंग बायस ९८.२१,ऋतुजा राजू शेटे ९७.६१,आदित्य आनंद कस्तुरे ९७.५१ ,अक्षय बाबू महाजन ९७.४९,सुहानी ऋषिकेश शहा ९६.९८,स्वस्तिक महादेव काबरा ९५.८५, रितिका रेवणसिद्ध चौगुले ९५.७७,जगदीश कडगंजी महाराज ९५.७७,मोहम्मद आझम मुजम्मिल अहमद शेख ९५.६२, गुरुप्रसाद सिद्धाराम हन्नुरे ९५.५०, ऋतिक काशिनाथ दसाडे ९५.१२,अथर्व सिद्धेश्वर तावरे ९४.४,अमित गणेश माढेकर ९१.७७,रुद्रसिंग राहुल इंगळे ९०.१८, विराज उदयकुमार पाटील ८९.२९, निखिल सिद्राम सबबन ८८.००,वरद गोविंद आदोने ८७.६९,अंजली अनिल व्हदलूरे ८७.२५,बुधभूषण महेंद्र गायकवाड ८७.२१,सात्विक राजशेखर हरकरे ८६.१६,समृद्धी तागडे ९६.७७.

या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय कॉलेज आणि आपल्या शिक्षकांना दिले. याच कार्यक्रमात नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी ) या राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धा परीक्षेत देशातून २२ वी ( ओबीसी प्रवर्ग )आलेल्या आलेली विद्यार्थ्यांनी श्रीस्मृती बुरकुल हिचा देखील यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. NIFT ने जागतिक दर्जाचे शिक्षण, उत्कृष्ट प्रशिक्षण आणि संशोधनाच्या संधीसह विद्यार्थ्यांना फॅशन तंत्रज्ञानातील शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षण उपल करून दिले आहे. NIFT मध्ये शिकलेला विद्यार्थी त्यांच्या सर्जनशील रचना आणि अतुलनीय व्यवस्थापन कार्यशैलीसह जागतिक स्तरावर भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्थेसाठी नाव कमवत आहे

# नीट परीक्षेत संगमेश्वर कॉलेजमधून शशिधर नामतुरे प्रथम



सोलापूर प्रतिनिधी : एनटीए (नेशनल टेस्टिंग एजन्सी) द्वारे मेडिकल प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे.या परीक्षेत संगमेश्वर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले निकाल याप्रमाणे - शशिधर नामतुरे ५२९(प्रथम), शिफा सवार ४९९(द्वितीय) , प्रियांशु रंजन ४८३(तृतीय) , गौतमी बनसोडे ४५१, संहिता वठारे ३७७, मानसी पाटील ३६७, ओंकार शीशेट्टी ३४४, शकुंतला कलशेट्टी, समर्थ अक्कलकोटे, ऐश्वर्या बिराजदार, सुखदा मालखरे, मुन्सिफा नदाफ, तेजस आयवळे, स्नेहल भालेराव, इशा काझी , मुजम्मिल कादरी, गणेश सकट.

यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. राजेंद्र देसाई , उपप्राचार्य श्री. प्रसाद कुंटे, पर्यवेक्षक श्री मल्लिनाथ साखरे, विज्ञान शाखा समन्वयक श्री. रामराव राठोड सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी वर्ग यांनी अभिनंदन केले.कॉलेजच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. याप्रसंगी बाळकृष्ण कापसे ,सुषमा पाटील, विशाल जत्ती, सिद्धाराम विजापूरे, डॉ.गणेश मुडेगावकर, संतोष पवारआदी उपस्थित होते. लीना खमितकर सूत्रसंचालन केले तर आभार नागेश कोले यांनी मानले.



नेचर वॉकच्या निमित्ताने संगमेश्वरच्या विद्यार्थ्यांशी वन्यजीव अभ्यासक डॉ. व्यंकटेश मेतन आणि प्राध्यापिका सोनाली गिरी यांनी संवाद साधला त्याप्रसंगाची काही क्षणचित्रे





